वर्ष- ११ | अंक- ३६ | मुंबई, मंगळवार, २२ जुलै ते २८ जुलै २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

PG 2

कॉण्टॅक्ट लेन्सपासून सावध

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

3 → खोटे चेहरे, खोटे आवाज.. एआयच्या माध्यमातून 'विश्वास'घात!

आदिवासी मजुराला बेदम मारहाण, जातीवाचक शिविगाळ ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## पोलिसांना दमबाजी करणाऱ्या आमदार रोहित पवारांविरुद्ध गुन्हा दाखल



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार रोहित पवार यांच्यावर आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांना दमबाजी करणे, पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांनाच आवाज चढवू नको असे मोठ्या आवाजात बोलणे रोहित पवारांना भोवले आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्यातील पोलिसांशी गैरवर्तन करणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे यासाठी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनात हाणामारी झाली. यानंतर पोलिसांनी हाणामारी प्रकरणी आव्हाडांच्या समर्थकाला अटक केली. या समर्थकाची सुटका व्हावी यासाठी आधी आव्हाडांनी निवडक कार्यकर्त्यांसोबत जाऊन रस्त्यात पोलिसांची गाडी अडवली. पण पोलिसांनी आव्हाड आणि त्यांच्या समर्थकांना बाजूला करुन पुढील कारवाई सुरू केली. पोलीस कार्यकर्त्याला सोडत नसल्याचे बघून आव्हाड थेट पोलीस ठाण्यात धडकले. तिथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आणि आमदार रोहित पवार पण पोहोचले. पोलीस ठाण्यात रोहित पवार आणि पोलीस अधिकारी यांच्यात वाद झाला होता. यावेळी रोहित पवारांनी पोलिसांना दमबाजी केली. या घटनेचे व्हिडीओ व्हायरल झाले. आता या प्रकरणात रोहित पवारांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याआधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधातही पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. आव्हाडांच्या विरोधातही सरकारी कामात अडथळा आणण्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## मालवणीतील तीघ्या अल्पवयीन बहिणींचे अपहरण करणारा हसनत आलमला अटक, पोलीसांनी केली १२ तासात मुलींची सुखरूप सुटका



**मुंबई :** १५ वषार्ची, सात वषार्ची आणि ११ महिन्याची अशा सख्ख्या तीन बहिणींचे हसनत रजा जमशेद आलम (वय, १८) याने अपहरण केले. मात्र पळून जात असतानाच वसई रेल्वे पोलीसांनी त्याला पकडले. बारा तासाच्या आतच तीनही मुलींची सुखरूप सुटका झाली. तर हसनत आलम याला पोलीसांनी अटक केली. सविस्तर माहिती आशी.

हसनत आलम हा मालवणी खारोडी येथील बांधकाम साईटवर मजूर म्हणून काम करायचा.त्याने परिसरातील एका १५ वर्षाच्या मुलीशी सलगी वाढवली. तीला गप्पा मारण्यासाठी पोनही घेऊन दिला. या मुलीची आई उदरनिवार्हासाठी कामाला जायची. या मुलीला ७ वर्षे आणि ११ महिन्याची बहिणही होती. हसनत आलमने त्या १५ वर्षाच्या मुलीला सोबत पळून जाण्यासबंधी विचारले. घरात आई नसताना दोन छोट्या बहिणींना सोडून मी येऊ शकत नाही असे तीने उत्तर दिले. यावर हसनत आलमने तीच्यासह तीच्या दोन लहान बहिणींना घेऊन पळून जायचा कट रचला. यासाठी त्याने त्याच्यासोबत मजदूरी करणाया अब्दुल कलाम रहसुद्दीन शेख (वय, १८) याची मदत घेतली. कामावरून घरी आल्यानंतर आईने पाहिले की तीनही मुली घरी नाहीत. तीने पोलीसात तक्रार केली.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ बेपत्ता झालेल्या मुलींचा शोध घ्यायला सुरुवात केली. चौकशीदरम्यान पोलिसांना कळले की मोठी मुलगी आलमच्या संपर्कात होती आणि तो देखील बेपत्ता आहे. यानंतर पोलिसांनी आलमचा मित्र मोहम्मदला ताब्यात घेऊन विचारपूस केली.त्याने गुन्हयाची कबूली दिली. आरोपींना आज न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## महिलेच्या इच्छेविरुद्ध बाळाला जन्म देण्यास बाध्य केले जाऊ शकत नाही: मुंबई उच्च न्यायालय

**मुंबई :** बलात्कारातून गर्भधारणा झालेली आहे, बाळाला जन्म द्यायचा नाही, त्यामुळे गर्भपात करण्याची परवानगी द्यावी अशी याचिका एका १३ वर्षाच्या मुलीच्या वतीने तीच्या पालकांनी कोर्टात दाखल केली होती. यावर महिलेला स्वताच्या आयुष्याविषयी आवश्यक निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तीला तीच्या इच्छेविरूद्ध बाळाला जन्म देण्याची सक्ती केली जाऊ शकत नाही असे से महत्त्वपूर्ण मत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व सचिन देशमुख यांनी व्यक्त केले.

पीडिता वाशिम जिल्ह्यातील असून एक दिवस ती एकटीच घरात होती. तीला एकटीला पाहून तीच्या वडिलांचा मामेभाऊ तीथे गेला. तिला ठार मारण्याची धमकी देऊन तीच्यावर बलात्कार केला, पोलिसांनी २ जुलै २०२५ रोजी बलात्कार व इतर संबंधित गुन्ह्यांचा एफआयआर त्याच्यावर दाखल केला. तर मुलीच्या पालकांनी तीच्या गर्भपातासंदर्भात न्यायालयाकडे परवानगी मागितली. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने पिडीतेला गर्भपात करण्याची परवानगी दिली आहे. पीडित मुलीतर्फे अॅड. सोनिया गजभिये यांनी बाजू मांडली.





## कल्याणच्या एपीएमसी मार्केट संचालकावर राजीनामा देण्याची आली वेळ - प्रशासकाच्या मनमानी कारभारा विरोधात संचालकांचा संताप

**कल्याण,** कल्याणच्या एपीएमसी मार्केटमधील भूखंड लक्ष्मी मार्केट व्यापारी संघटनेला दिल्यानंतर एपीएमसीमधील संचालक प्रशासकावर चांगलेच संतापले आहे. हा भूखंड नियमबाह्य पद्धतीने दिला गेला असल्याचा आरोप करीत आमच्या संचालकांच्या चालत नाही तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाऊन राजीनामा देण्याचे विधान केल्याने राजकीय वतूर्ळात एकच खळबळ उडाली आहे. लक्ष्मी मार्केटच व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. घेतलेला भूखंड हा कायदेशीर आहे. एपीएमसीमधील काही लोक आर्थिक फायद्यासाठी हे सगळे करीत आहे. या वादामुळे एपीएमसी व्यापारी संघटनेने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. कल्याणच्या एपीएमसी मार्केटमध्ये एक भला मोठा भूखंड आहे. हा भूखंड लक्ष्मी मार्केट व्यापारी संघटनेला देण्यात आला आहे. यावरुन एपीएमसी



मार्केट संचालक आणि प्रशासकामध्ये चांगला वाद निर्माण झाला आहे. एपीएमसीचे सभापती रविंद्र घोडविंदे, संचालक भाऊ गोंधळी यांच्यासह सर्व संचालकांनी कल्याणच्या बाजारपेठ पालिस ठाण्यात एकत्रित येऊन लक्ष्मी मार्केट संघटनेच्या विरोधात तक्रार करण्यासाठी गेले. नियमांचे पालन न करता प्रशासकाकडून हा भूखंड लक्ष्मी मार्केट संघटनेला देण्यात आला आहे. हे अतिशय चुकीचे आहे. याचा आम्ही निषेध करतो. मात्र प्रशासक वागणूक चुकीची आहे. एपीएमसीची निवडणूक झाली. त्या निवडणूकीत आम्ही निवडून आलो. प्रशासक म्हणतो की आत्ता पर्यंत एपीएमसीचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. तर निवडून आलेल्या सदस्यांचा काय फायदा. लोकशाहीत असे कसे चालणार. या बाबत संचालक भाऊ गोंधले यानी सांगितले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाऊन आपल्या पदाचा राजीनामा देणार आहोत. या बाबत एपीएमसीमधील व्यापारी संघटनेचे नेते गणेश पोखरकर यांनी सांगितले की, प्रशासकाच्या मनमानी कारभाराच्या विरोधात सर्व व्यापारी आंदोलन करणार आहोत. लक्ष्मी मार्केट व्यापारी संघटनेचे सचिव रफिक तांबोळी यांचे म्हणणे आहे की, हे जे संचालक निवडून आले आहे. त्यांच्याकडे चार्ज नाही. चार्ज हा प्रशासकाकडे आहे. भूखंडा संदर्भात जी प्रक्रिया केली ती नियमानुसार आहे. काही लोक आर्थिक फायद्यासाठी हे करीत आहे. नाव न घेता त्यांनी एकप्रकारे एपीएमसी संचालकावर बोट ठेवले आहे. या प्रकरणामुळे नेहमी वादाच्या भोवऱ्यात असलेली एपीएमसी वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

## अंबरनाथ पोलिसांनी सोनसाखळी चोरट्यांना ठोकल्या बेड्या




**■ अंबरनाथ।**
अंबरनाथ येथील गॅस गोडाऊन जवळ मुलांना शाळेत घेऊन जात असताना मोटरसायकलवरुन आलेल्या तीन चोरट्यांनी त्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र सोनसाखळी चोरून ते पसार झाले. मात्र याबाबत अंबरनाथ शिवाजी ठाण्यात तक्रार केली असता या चोट्यांचा शोध घेऊन अखेर बदलापुरातून आकाश उर्फ बादल सिंग, अमन यादव व रणजीत सिंग या तिन्ही चोरट्यांना अंबरनाथ शिवाजीनगरच्या डीबी पथकाने शिताफिने अटक केली व मालही हस्तगत केला. त्याची माहिती उल्हासनगर ४चे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली. या चोट्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्यावर यापूर्वीही चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे सांगण्यात आले.

## डोंबिवली एमआयडीसीमध्ये गढूळ पाण्याने नागरिक त्रस्त, नागरिकांपुढे आरोग्याचा प्रश्न

### खोदकाम करताना पाईपलाईन नादुरुस्त

**■ कल्याण।**
डोंबिवली एमआयडीसी निवासीमध्ये रहिवाशांच्या घरात गडूळ पाणी येत असल्याने नागरिक संतापले असून त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शुक्रवार दुपारपासून मिलाप नगरमधील वसंत छेडा आणि इतर काही बंगल्यांमध्ये गढूळ, अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त पाणी बेत असल्याचे दिसल्यावर काहींनी ते समाज माध्यमावर टाकून आपली नाराजी व्यक्त केली, तर काहींनी ही बाब एमआयडीसीला कळविली. मिलापनगर मधील बहुतेक बंगलोमध्ये त्यांच्या किचनमध्ये एमआयडीसी पाईपलाईनमधून एक जोड्णी थेट घेण्यात आली आहे. त्यामुळे ते पाणी टाकीत न जाता थेट घरात व स्वयंपाकघरात जात असते. तेच पाणी पिण्यासाठी आणि अन्नपदार्थ बनवण्यासाठी वापरत असतात; परंतु हे पाणी गढूळ येत



असल्याने नागरिकांपुढे आता आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला झाला आहे. गढूळ पाणी आल्याने काही रहिवाशांनी पॅकबंद बाटलीतले पाणी विकत आणून आपली गरज भागविली. हे गढूळ पाणी येण्याचे कारण काय असावे याबद्दल काही नागरिकांनी शोध घेतला असता एमआयडीसीमध्ये नवीन नाले गटारांची आणि भूमिगत सांडपाणी वाहिन्यांची कामे जोरात सुरू असून त्यामुळे खोदकाम करताना पाण्याच्या पाईपलाईन या नादुरुस्त होत असल्याने त्यावेळी त्यात बाहेरील पावसाचे आणि उघड्या गटारातील पाणी मिसळले जात असावे. तसेच काही ठिकाणी पाण्याच्या भूमिगत पाईप लाईनला काँक्रीट रस्ते, सांडपाणी वाहिन्या इत्यादी बनविताना धक्के बसून पाईप लाईनला चिरा पडून पाण्याची गळती जमिनीत सुरू असावी, अशा अनेक कारणांमुळे गढूळ, अस्वच्छ पाणी येत असावे अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. एमआयडीसीकडून याबद्दल माहिती मिळाली नसून त्यांच्याकडून ही गंभीर बाब दुर्लक्ष केली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी गरम करून उकळून प्यावे अशी विनंती सर्वांना करण्यात येत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

## बोगस डॉक्टर व अन्य तीन डॉक्टरां विरुद्ध गुन्हा दाखल

**उल्हासनगर,** कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय परवाना नसतांना श्रीकृष्ण कुमावत या कथित बोगस डॉक्टरने साई क्लिनिक नावाचा खाजगी दवाखाना उघडून त्या ठिकाणी आरोपी डॉ चंदर रोहरा, डॉ अरुण भाकरे, डॉ सुरेश पिलारे या डॉक्टरांच्या नावाने २०१८ ते मार्च २०२४ दरम्यान वैद्यकीय व्यवसाय केला असल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात या चारही आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगर - ४ येथील एस एस टी महाविद्यालयाजवळ असलेल्या साई क्लिनिक या खाजगी दवाखान्यात श्रीकृष्ण कुमावत हा बोगस डॉक्टर २०१८ पासून वैद्यकीय व्यवसाय करीत आहे. त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय परवाना नसल्याचा आरोप



फियार्दी डॉ राकेश गाजरे यांनी केला आहे या संदर्भात त्यांनी वेळोवेळी आरोग्य विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत. या तक्रारीनंतर आरोग्य विभागाने चौकशी केली असता डॉ सुरेश पिलारे हे रुग्णांची तपासणी करीत असून श्रीकृष्ण कुमावत हे कंपाउंडरचे काम करतात अहवाल दिला होता. त्यानंतर डॉ राकेश गाजरे यांनी कुमावत हे स्वतः रुग्णांची तपासणी करीत असल्याचे व्हिडिओ क्लिप आरोग्य विभाग कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे सादर केले होते. आरोग्य विभागाने कुमावत यांना रुग्णांची तपासणी करण्यासाठी उपस्थित न राहण्याची सूचना दिली होती व पुन्हा असे दिसल्यास तुमच्याविरुद्ध बोगस डॉक्टर म्हणून कारवाई करण्यात येईल अशी समज देखील दिली होती. या कारवाई नंतर देखील श्रीकृष्ण कुमावत हा साई क्लीनिक मध्ये डॉ. चंदर रोहरा, डॉ अरुण भाकरे, डॉ सुरेश पिलारे या डॉक्टरांचे नाव नावाने वैद्यकीय व्यवसाय करीत आहे असा आरोप डॉक्टर राकेश गाजरे यांनी केला होता या संदर्भात त्यांनी पुरावे देखील सादर केले होते. आरोपी डॉक्टरांनी कोरोना काळात संगणमत करून रुग्णांची आर्थिक फसवणूक केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर डॉ राकेश गाजरे यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने या संदर्भात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याला आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी डॉ चंदर रोहरा, डॉ अरुण भाकरे, डॉ सुरेश पिलारे आणि बोगस डॉक्टर श्रीकृष्ण कुमावत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गवळी हे करीत आहे.

## शाळकरी मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न, रिक्षा चालकास अटक तर साथीदार फरार

**■ भिवंडी।**
अल्पवयीन शाळकरी मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न करणाया रिक्षा चालकास ताब्यात घेऊन बेड्या ठोकण्यात शांतीनगर पोलिसांना यश आले आहे. असगर अली शाबीर अली शेख (३५) असे अटक केलेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. तर त्याच्या साथीदाराचा शोध पोलीस घेत आहेत. शहर परिसरात राहणारी १६ वर्षीय अल्पवयीन तरुणी बुधवार ९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता शाळेत जाण्यासाठी रिक्षाने निघाली असता रिक्षा रामनगर येथील पाण्याच्या टाकी जवळील शाळेजवळ आली असता विद्यार्थिनीने चालकास रिक्षा थांबविण्यास सांगितली. मात्र रिक्षा चालकाने रिक्षा न थांबविता पुढील बाजुस नेऊन मुलीस जबदरस्तीने पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता.त्यावेळी प्रसंगावधान



राखत विद्यार्थिनीने स्कूलबॅग मधील कंपास पेटी मध्ये असलेले कर्कटकने रिक्षावाल्यास मारले आणि शेजारील बसलेल्या त्याच्या साथीदारास धक्का मारून रिक्षातून उडी मारून स्वतःची सुटका करून घेतली. त्यानंतर विद्यार्थिनी शाळेत पोहचली होती. घरी आल्यावर तिने आपल्या सोबत घडलेला प्रसंग आई वडिलांना सांगितला. त्यानंतर शुक्रवारी विद्यार्थिनीच्या तक्रारीनंतर अज्ञात रिक्षाचालक व त्याचा साथीदार अशा दोघांविरोधात गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून विद्यार्थिनीने दिलेल्या वर्णनावरून रिक्षा चालकाचा शोध सुरू केला होता. त्यातच गुन्ह्याचा तपास सुरू असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी १३ जुलै रोजी फातिमा नगर येथे सापळा रचून रिक्षा चालकास ताब्यात घेऊन अटक केली. रिक्षा चालकास १४ जुलै रोजी न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयीन कोठडी रिमांड मंजूर करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस तपास करत आहेत. तसेच त्याच्या साथीदाराचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. ही कामगिरी पोलीस उपायुक्त शशीकांत बोराटे, शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक (प्रशा) विनोद पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल अड्डुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सह पोलीस निरीक्षक योगेश गायकर, पोलीस उपनिरीक्षक कालु गवारी, पोलीस हवालदार संतोष पवार,संतोष मोरे, पोलीस कर्मचारी दिनेश भुरकुड,किरण जाधव, पोलीस शिपाई रवि पाटील, गणेश कांबळे आदी पोलीस पथकाने केली आहे.

# सफरचंद आणि केळी खाण्याची योग्य वेळ

**फळांचे** सेवन करणे आमच्या आरोग्यासाठी उत्तम ठरतं, कारण याने कमजोरी दूर होते. तसेच आजारी पडल्यावर डॉक्टर्सदेखील फळं खाण्याचा सल्ला देतात. फळं खायचा हा विचार करून अनेक लोकं दिवसातून कधीही फळांचे सेवन करतात, परंतु असे करणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरू शकतं. तर जाणून घ्या योग्य वेळ -

सकाळी नाश्ता करताना सफरचंद खाणे सर्वात योग्य ठरेल. यात पेक्टिन नामक तत्त्व आढळतं ज्यामुळे बीपी लेव्हल लो होतं आणि कोलेस्टरॉल कमी करण्यातदेखील मदत करतं. सफरचंद रात्री खाणे टाळावे कारण हे पचण्यास कठीण जाते आणि याने ॲसिडीटीचा त्रास उद्‌भवू शकतो.

तसेच केळी खाण्याची योग्य वेळ सांगायची तर दुपारच्या जेवण्यानंतर. याने शरीरातील रोग प्रतिकारशक्ती वाढते. रात्री केळी खाण्याने पचण्यात त्रास होतो.

तसेच बटाटा किंवा बटाट्याचे पदार्थ खाण्याची इच्छा असल्यास ब्रेकफास्ट ही वेळ सर्वात उत्तम आहे. कारण यातील हाय कॅलरीज. रात्री याचे सेवन केल्याने गॅसची समस्या आणि लठ्ठपणा वेगाने वाढू शकतो.

आता प्रश्न हा आहे की रात्री काय सेवन करू शकतो तर दूध पिण्यासाठी रात्रीची वेळ योग्य आहे. याने चांगली झोप येते. तरी आपण व्यायाम करत असाल तर सकाळी दूध पिणे योग्य ठरेल.



# रंगाला अनुसरून करा मेकअप



**▮गोऱ्या रंगासाठी**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हेवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूफ शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.

**▮गडद रंगाच्या त्वचेसाठी**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

**▮पिवळ्या रंगाची त्वचा**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

**▮गव्हाळ त्वचेसाठी**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्यूटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरूम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.



# वजन कमी करण्यासाठी ‘ही’ पेये आहेत उपयुक्त

**वजन कमी करायचे तर हे खा, ते करा असे सल्ले लठ्ठ व्यक्तींना सातत्याने देण्यात येतात. यामध्ये आहारतज्ज्ञांबरोबरच घरातील व्यक्ती आणि मित्रमंडळीही पुढे असतात. मात्र काही पेयांमुळेही वाढलेले वजन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे हे सोपे उपाय वेळीच जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे. या पेयांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास शरीरावर वाढलेली अनावश्यक चरबी कमी होण्यासाठी त्याचा उपयोग होतो. पाहूयात काय आहेत हे उपाय...**

**▮पाणी**

आरोग्याला सर्वात फायदेशीर कोणते पेय असेल तर ते म्हणजे पाणी. पाण्याला जीवन म्हटले जाते ते खरेच आहे. दिवसभरात जास्तीत जास्त पाणी पिणे आवश्यक असते. यामुळे अनेक शारीरिक अडचणींपासून सुटका होते. यामध्ये थोड्या प्रमाणात लिंबू पिळल्यास तेही फायदेशीर ठरू शकते.

**▮व्हेजिटेबल सूप**

जंकफूड खाण्याऐवजी व्हेजिटेबल सूप घेणे वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर ठरते. यामुळे आपण आहारातून घेत असलेल्या कॅलरीज कमी होण्यासही मदत होते. तसेच सर्व भाज्या शरीरात जातात ज्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतात.

**▮ग्रीन टी**

ग्रीन टी आरोग्यदायी असतो असे म्हटले जाते मात्र तो कधी आणि कसा घ्यावा याचेही काही नियम आहेत. ते पाळून ग्रीन टी घेतल्यास तो अतिशय उपयुक्त ठरू शकतो. शरीरातील ग्लुकोज आणि साखर कमी करण्यासाठी ग्रीन टीचा उपयोग होतो. त्यामुळे शरीरातील फॅट्स जळण्यासही मदत होते आणि ग्रीन टी हा वजन करण्याचा उत्तम उपाय ठरतो.

**▮काळी कॉफी**

शरीरातील फॅटस बर्न करण्यासाठी आणि मेटाबॉलिझम चांगला रहावा यासाठी काळी कॉफी अतिशय उपयुक्त असते. आपण ज्यावेळी आराम करतो त्यावेळी या कॉफीतील कॅफेन हा पदार्थ फॅट्स बर्न करण्याचे काम करतो. त्यामुळे तुम्हाला चहा किंवा कॉफी घेण्याची इच्छा झाल्यास काळी कॉफी घेणे हा अतिशय उत्तम उपाय ठरु शकतो.

**▮स्कीम्ड मिल्क**


दूध हे आरोग्यासाठी कायमच चांगले असते. मात्र त्यातील स्निग्धांश कमी करून हे दूध घेतल्यास ते नक्कीच आरोग्यदायी असते. जन्मापासून दूध हेच मुख्य अन्न असल्याने ते आयुष्यभर उपयुक्त ठरते. दुधामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असतात, जी आरोग्याला उपयुक्त ठरू शकतात. हाडे मजबूत राहण्यासाठीही दुधाचा उपयोग होतो.



# कॉण्टॅक्ट लेन्सपासून सावध

**चष्मीश झालेले कोणाला आवडेल? विशेषतः कमी वयात चष्मा लागला असेल तर तो नकोच असतो कारण चष्मा असेल तर लग्नात अडथळे येतात. मुलाकडची मंडळी, चष्मेवाली मुलगी नको असे स्पष्ट सांगतात. चांगली स्थळे हातची जातात. पण चष्मा लागलाच तर काय करणार? त्यावर इलाज म्हणजे कॉण्टॅक्ट लेन्स. हजारो मुली चष्म्याच्या ऐवजी कॉण्टॅक्ट लेन्स लावत असतात. पण आता काही निरीक्षणांती शास्त्रज्ञ अशा निष्कर्षाप्रत आले आहेत की कॉण्टॅक्ट लेन्स लावणे हे धोक्याचे आहे.**

नळाच्या पाण्यात असणारा एक जंतू कॉण्टॅक्ट लेन्सच्या माध्यमातून डोळ्यात आणि बुबळात प्रवेश करतो आणि डोळ्याला अपाय करतो. त्यातून कदाचित अंधपणाही येऊ शकतो. या जंतूचे नाव ऍकान्थमोईबा असे आहे. तो नळाच्या पाण्यात जसा सापडतो तसाच तो धुळीत, समुद्राच्या पाण्यात, पावसाच्या पाण्यात आणि जलतरण तलावातल्या पाण्यातही सापडतो. हा जंतू अनेकांना अंधत्व बहाल करण्याची शक्यता आहेच, पण ती शक्यता कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांच्या बाबतीत अधिक आहे. या जंतूचा संसर्ग होण्याचे एकूण प्रकार कमीच आहेत, पण त्यावर उपचार फार काळपर्यंत करावे लागतात आणि त्यातूनही गुण येण्याची शक्यता कमीच असते. म्हणून त्याच्यापासून सावध राहिले पाहिजे. या प्रकाराची माहिती ‘डेली मेल’ या दैनिकाने प्रसिद्ध केली आहे. या जंतूचा उपसर्ग होण्याची शक्यता कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांच्या बाबतीत जास्त आहे. कारण या लेन्सचे आपल्या डोळ्यातले स्थान वेगळेच असते. स्कॉटलंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ स्कॉटलंड मधील संशोधक डॉ. फियोना हेन्रीक्वेझ यांनी हे कारण आपल्या निरीक्षणातून शोधून काढले आहे. कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाच्या व्यक्तीच्या नजरचुकीने लेन्स घालताना ते या जंतूसह घातले गेले तर ते बुबळात प्रवेश करतात आणि लेन्सच्या आधाराने तिथेच राहतात. एकदा तिथे प्रवेश मिळाला की त्यांना बाहेर जाता येत नाही. तिथेच ते आपले काम सुरू करतात. बुबळाला टोकरायला लागतात आणि आत प्रवेश करतात. तिथेच त्यांची वीण वाढते आणि त्यांचे काम व्यापक होऊन जाते. डोळ्याची क्षमता कमी होते.



या जंतूचा प्रादुर्भाव झाला असेल तर डोळ्यांतून सतत पाणी येते. डोळ्यांचा दाह होतो. समोरचे दृश्य पुसट दिसायला लागते. डोळ्याला प्रकाश सहन होत नाही. वरची पापणी सुजते आणि तिला वेदना होतात. काही तज्ज्ञांच्या मते तर या जंतूच्या संसर्गामुळे साधारण आठवडाभराच्या काळात दृष्टी जाऊ शकते. अर्थात या त्रासावर इलाज आहेच. काही ड्रॉप्स त्यासाठी सुचवले जातात. तर वीस मिनिटाला ते डोळ्यात टाकले तर तीन आठवड्यांमध्ये हा त्रास कमी होऊ शकतो. मात्र या काळात रुग्णाला रुग्णालयात ॲडमिट व्हावे लागते. त्रास अधिक प्रमाणात असल्यास शस्त्रक्रिया करावी लागते.

# लिंबूपाणी प्या आणि सदैव निरोगी राहा

**सदैव** ताजेतवाने आणि फ्रेश राहण्यासाठी लिंबूपाण्याचे सेवन नियमित केलेले चांगले. लिंबूमध्ये ‘क’ जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते. शरीरासाठी आवश्यक असणारी ‘क’ जीवनसत्वाची कमतरता लिंबूपाणी सेवनाने भरून काढता येते.



लिंबूपाणी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याबरोबरच पोटॅशिअमचीही गरज पूर्ण होते. पोटॅशिअममुळे आपल्या मेंदूला फायदा होतोच आणि ब्लडप्रेशरवरही ताबा ठेवता येतो. तुम्हाला जर चहा कॉफीची सवय कमी करायची असेल तर लिंबूपाणी उत्तम. लिंबूपाणी सेवनाचा आणखी एक फायदा तो म्हणजे रक्तशुद्धी ज्यामुळे शरीर स्वस्थ राहण्यास मदत होतेच आणि शरीर ताजेतवाने राहते. जीवनसत्त्वाने भरपूर आणि लाभदायक असे हे लिंबूपाणी कधीही सेवन केले तरी चालते मात्र रात्री जेवणानंतर घेऊ नये. हे आपल्या शरीरासाठी हानीकारक ठरू शकते.

# दातांचा पिवळेपणा घालवा केवळ एका सोप्या उपायाने

**येथे** आम्ही आपल्याला चार उपाय सांगत आहोत ज्यातून एक जरी उपाय नियमाने केला तर दातांचा पिवळेपणा घालवता येईल.

**मीठ आणि लिंबू**

एक चमचा लिंबाच्या रसात दोन चमचे समुद्री मीठ मिसळून पेस्ट तयार करा. ब्रशच्या मदतीने दातांवर हलक्या हाताने घासा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा वापरा. अशाने लिंबू दातांना नैसर्गिकरीत्या ब्लीच करेल आणि पिवळा थर काढण्यास मदत करेल.

**बेकिंग सोडा आणि लिंबू**

एक चमचा बेकिंग सोडा घेऊन त्यात २ चमचे लिंबाचा रस मिसळा. ही पेस्ट दातावर लावून ३ ते ४ मिनिट तसेच राहू द्या. नंतर पाण्याने गुळण्या करा. बेकिंग सोड्यात आढळणारे ब्लीचिंग गुण दातांना स्वच्छ करतील. हा प्रयोग आठवड्यातून दोनदा करू शकता.

**ऑर्गेनिक कोकोनट ऑईल**

ऑर्गेनिक कोकोनट ऑईलमध्ये लोरिक ॲसिड आढळतं. याने दातातील पिवळेपणा दूर होऊन दात मजबूत होतात. यासाठी तेलाचे काही थेंब दातावर लावून बोटाने मसाज करावी. नंतर ५ मिनिटे असेच राहू द्यावे. नंतर गुळण्या कराव्या.

**ॲप्पल साइडर व्हिनेगर**

१ कप पाण्यात दोन चमचे ॲप्पल साइडर व्हिनेगर टाकून त्याने गुळण्या केल्याने दात पांढरे दिसू लागतात सोबतच तोंडातील दुर्गंध दूर होते.

**केळीच्या तुकड्याने करा मसाज**

पोटॅशियमयुक्त केळ वापरल्याने दातांवरील पिवळेपणा आणि दुर्गंध दूर होते. याने दात मजबूत होतात. केळीचे तुकडे दातावर घासत ५ मिनिटांपर्यंत मसाज करावी. नंतर कोमट पाण्याने गुळण्या कराव्या. याने दात स्वच्छ आणि चमकदार होतात.



# साडी नेसण्याचे ५ वेगवेगळे प्रकार

**खरं तर साडी कोणत्याही शरीराच्या प्रकारावर शोभून दिसते, जर चांगली टेक्निक वापरून नेसली तर कोणतीही महिला यामध्ये स्लिम दिसू शकते. साडी नेसण्याचे अनेक प्रकार आहेत; तथापि काही विशिष्ट स्टाइलसाठी आकार, लांबी आणि डिझाइनच्या साडीची आवश्यकता असते. साडी ही सर्वात जुनी तरीही मोहक पोशाख आहे. तरीही सगळ्यांनाच चांगला प्रकारे साडी नेसता येतेच असे नाही. नोंदणीकृत ८० प्रकारांपेक्षा अधिक पद्धतीने साडी नेसता येऊ शकते. कमरेला गुंडाळून खांद्यावरून पदर काढून खालच्या भागात सैल गोलाकार घेर सोडणे ही सर्वात सामान्य पद्धत आहे. एका साडी बरोबर, तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे लूक आणि स्टाईल प्राप्त करू शकता! तुम्ही प्रयत्न केल्यास नक्कीच स्लिम फिट साडी तुम्हाला नेसता येऊ शकते. आज जाणून घेऊया पारंपरिकसह वेगवेगळ्या आधुनिक पद्धतीने साडी नेण्याचे महत्त्वाचे ५ प्रकार.**

**असं म्हटलं जातं की ‘बदल नियमित असतो’ परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो तेव्हा ते खरं ठरत नाही. अनेक शतकापासून पारंपरिक साडीचा ट्रेंड आजही कायम आहे. साडी हे असे वस्त्र आहे जे स्त्रियांची सुंदरता वाढवतेच आणि कालमर्यादा दर्शवते, भारत कांजीवरम, बनारसी, पैठणी अशा विविध प्रकारच्या साड्यांचे भांडार आहे.**

**३. बेल्ट स्टाईल**

बेल्ट साडी हा प्रकार आपल्या पारंपरिक कमर पट्टा, नववधूच्या साडीवर आधारित आहे. यावर पातळ, रुंद किंवा कापडी बेल्ट देखील वापरला जाऊ शकतो.

**पद्धत :** आपल्या साडीला सामान्यपणे ड्रेप करा आणि तुमच्या कमरेवर बेल्ट घाला. तुम्हाला अधिक पारंपरिक लूक हवा असल्यास तुम्ही कमरबंध किंवा कमर पट्टा वापरू शकता. या साडीवर ऑफ शोल्डर किंवा इतर स्टाइलचे ब्लाऊज वापरू शकता. यामध्ये तुम्ही पदर ही बेल्टला जोडू शकता.



**४. धोती स्टाईल**

पुढच्या वेळी जेव्हा आपण लग्न समारंभात जाणार असाल उपस्थित राहाल तेव्हा हे ऑफबीट पहा. धोती स्टाईल साडी ही पँट स्टाईल साडी सारखीच असते आणि ही साडी परंपरा आणि आधुनिकतेचे सुंदर मिश्रण आहे. उत्कृष्ट साडी ड्रेपिंगसह सहज कॅरी करणाऱ्या सामंथा, शिल्पा शेट्टी आणि सोनम कपूर यांच्यासारख्या प्रसिद्ध अभिनेत्रींनी धोती साडी लोकप्रिय केली आहे.

**पद्धत :** चांगल्या ड्रॅपिंगसाठी आपण पेटीकोट ऐवजी लेगिंग वापरू शकता. थोडीशी धोती स्टाईल आहे, परंतु नेसवणे आणि सजवणे अतिशय सोपे आहे. १ ते २ मीटर साडी कमरेच्या भोवती गुंडाळा, पदर काढू नका. आता डावीकडील आणि उजवीकडील भाग दोन्ही मागच्या बाजूने काढून ते पिन करून घ्या, ज्यामुळे धोती सारखा आकार दिसेल. तिथून ३ ते ४ प्लेट्सचे पदर काढून ब्लाउजवर वर पिन करा. पदर शक्यतो लांब असू द्या. यामध्ये प्रिंटेड साडी टाळा, कारण त्यामुळे धोती स्टाईल स्पष्ट दिसत नाही. प्लेन कलरमध्येच साडी निवडा.





**१. स्कार्फ / नेक रॅप स्टाईल :**

स्कार्फ / नेक रॅप स्टाईल हे केवळ आधुनिक आणि स्टाइलीशच नाही तर थंड हवेच्या ठिकाणी किंवा हिवाळ्यामध्ये साडीचा हा प्रकार शरीराला उबदार ठेवण्यास मदत करतो.

**पद्धत :** नेहमीसारखा साडीला पदर काढण्या ऐवजी, पदराचा वेगवेगळ्या पद्धतीने स्कार्फसारखा वापर करा. जेव्हा तुम्हाला तुमची साडी तुमच्या गळ्याभोवती गुंडाळायची असेल, तेव्हा जसा ट्रेंड चालू असेल त्याप्रमाणे करावे. नेक बेल्ट किंवा इतर ॲक्सेसरीज जोडाव्या, जेणेकरून ग्लॅमरस लूक मिळेल.



**५. जलपरी स्टाईल :**

मुमताज साडी आणि लेहेंगा साडीबरोबर तुम्ही जर मर्मेड स्टाईल (जलपरी) साडीची तुलना केली तर येथे जास्त फरक जाणवत नाही. सर्व काही एकसारखेच वाटते, परंतु जेव्हा तुम्ही पदर पुन्हा ड्रेप करता तेव्हा त्यात जो बदल येतो तो लक्षणीय असतो.

**पद्धत :** या ड्रेपिंग स्टाइलमुळे प्लेट्सचा खालचा भाग बाहेर पसरतो, ज्यामुळे त्याचा आकार एखाद्या माश्याच्या शेपटी प्रमाणे दिसतो. बघून असं वाटतं की या साडीवर खूप मेहनत करावी लागत असेल, परंतु केवळ काही अतिरिक्त टक्स आणि प्लेट्स आवश्यक आहेत. या साडीचे पदर इतर कोणत्याही साडीपेक्षा अधिक पटकन दिसतो. म्हणून मोठा, भरजरी आणि नक्षीकाम काम केलेला पदर निवडा.



**२. केप स्टाइल**

ही एक साडी नेसण्याची वेगळी पद्धत आहे, गळ्यापासून ते छातीपर्यंत गोलाकार पद्धतीचा पारदर्शक फॅब्रिकचा विणलेला केप असतो, त्याला केप स्टाईल साडी म्हणतात.

**पद्धत :** थोडासा ग्लॅमरस लूक देण्यासाठी हा योग्य प्रकार आहे. तुम्हाला जी हवी ती साडी घ्या आणि तुमच्या निवडलेल्या साडी सोबत मॅच होईल असे एक केप घ्या. तुमच्या गळ्यामध्ये केप घाला, तुमचा गळा ते छाती म्हणजे तुमचा ब्लाऊज झाकला जाईल याचा प्रयत्न करा. जरी ब्लाऊज झाकला जात असला तरी पारदर्शक केपमुळे तुमचा ब्लाऊजही त्यातून उठून दिसेल. वेगवेगळ्या डिझाईन आणि एम्ब्रॉडायरीचा केप तुम्हाला आकर्षक लूक देण्यास मदत करेल.

# पीरियड्‌सच्या वेदनांपासून मुक्तीसाठी त्या दिवसात काय खावे जाणून घ्या!

**मासिक धर्म वेदनांपासून मुक्तीसाठी आहारात सामील करा हे पदार्थ**

▮दर महिन्यात चार दिवस किंवा एका आठवडा महिलांवर मासिक धर्माचे दिवस फार जड जातात. पीरियड्स येण्यापूर्वी आणि त्या दरम्यान अनेक त्रासाला सामोरं जावं लागतं. अशात महिलांनी त्या कशा प्रकारचा आहार घेत आहेत याकडे लक्ष द्यावं कारण याचा परिणाम आरोग्यावर होतो. जाणून घ्या या वेळेत काय खावे आणि काय नाही.

▮अख्खं धान्य वाळवलं किंवा प्रोसेस केलं जात नाही त्यामुळे यातील पोषक तत्त्व टिकून राहतात. हे कार्बोहायड्रेट्स आहेत जे सेरोटोनिन रिलीज करतात. सेरोटोनिन हार्मोनमुळे या दिवसात आराम जाणवतो.

▮पीरियड्सदरम्यान भूक कमी होऊन जाते आणि शरीरात आयरनची पातळी कमी होऊ लागते म्हणून यादरम्यान दुपारच्या जेवण्यात हिरव्या पालेभाज्या सामील कराव्या. याने शरीराला पुरेसे पोषक तत्त्व आणि व्हिटॅमिन्स ‘ड’ मिळतं. हे रक्तस्राव आणि ब्लड क्लॉटिंगला नियंत्रित करतं.

▮पीरियड्सदरम्यान सॅलमन आणि टूना सारखे मासे खाल्ल्याने वेदनांपासून मुक्ती मिळते. यात भरपूर प्रमाणात प्रोटीन आढळतं.

▮पीरियड्समध्ये गोड खाण्याची इच्छा होते. अशात केक किंवा मिठाई सारखे इतर काही गोड पदार्थ खाण्यापेक्षा गोड फळं खाणे योग्य ठरेल.

▮यादरम्यान ताण, चिडचिड यापासून मुक्तीसाठी मिंट किंवा आळं-मधाचा चहा पिणे योग्य ठरतं. याने मानसिक शांती मिळते.

▮पीरियड्सच्या दरम्यान काळं मीठ मिसळून कोमट पाण्याने अंघोळ केल्याने आणि भरपूर झोप घेतल्याने आराम मिळतो.

**हे पदार्थ टाळा**

▮कॉफी किंवा कॅफीनयुक्त पेय पदार्थ. याने ताण वाढतो आणि डिहायड्रेशनचा धोका असतो.

▮तळकट पदार्थांचे सेवन टाळावे. याने वेदना वाढतात.

▮साखरेचे सेवन करणे टाळावे. याने सुस्ती वाढते आणि ताण व चिडचिड होते.



पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, २२जुलै ते २८ जुलै २०२५


## संपादकीय

# खोटे चेहरे, खोटे आवाज.. एआयच्या माध्यमातून ‘विश्वास’घात!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक





राज्यातील एक प्रतिष्ठित आणि कर्तव्यदक्ष अधिकारी, विश्वास नांगरे पाटील यांचा चेहरा आणि आवाज एआयच्या माध्यमातून हुबेहूब तयार करून एका सेवानिवृत्त सरकारी अधिकर्यायाच्या दाम्पत्याची तब्बल ७८ लाख रुपयांनी फसवणूक करण्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. एआयच्या माध्यमातून होर्णाया ‘विश्वासघाताचा’ हा प्रकार सर्यायांनाच खडबडून जागं करणारा आहे. आज केवळ चेहरा आणि आवाजाचाच वापर होत आहे. भविष्यात संपूर्ण आभासी माणूस उभा केला जाईल. त्यामुळे या तंत्रज्ञानाकडे आतापासूनच सजगपणे बघणे गरजेचे आहे.

काडेपेटीचा शोध चूल पेटवण्यासाठी लागला, पण याच काडेपेटीने जर कुणाचे घर जळाले तर? चाकूचा शोध गवत, भाजी कापण्यासाठी लागला, पण याच चाकूने कुणाची मान कापली तर? यात शोध लावर्णायाचा काय दोष? कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाच्या बाबतीत सध्या असेच घडत आहे. या तंत्रज्ञानाला दोष देत आता काही मंडळी बोटं मोडत आहे. खरं तर, काही दशकांपूर्वीपर्यंत केवळ विज्ञानकथांमध्ये उल्लेखले गेलेले हे तंत्रज्ञान आज आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.

या तंत्रज्ञानाने मानवी निर्णयक्षमता, संवाद, शिकण्याची प्रक्रिया आणि भावनांचा अभ्यास करून त्याचे अनुकरण करणारी एक स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली आहे. शिक्षण, वैद्यकीय उपचार, वाहतूक व्यवस्था, उद्योगक्षेत्र, शेती आणि अगदी अंतराळ संशोधनापर्यंत या तंत्रज्ञानाचा अचूक आणि प्रभावी वापर होत आहे. काही सेकंदांत रुग्णाच्या आरोग्यविषयक अहवालांचे विश्लेषण करून निदान देणारे यंत्र, शाळांमध्ये व्यक्तिगत अध्ययन पद्धती उभारणारी प्रणाली, उत्पादन क्षेत्रात कार्यक्षमता वाढवणारे रोबोट, यातून या यंत्रमानवसमान बुद्धिमत्तेची ताकद अधोरेखित होते. मात्र, एखादे शस्त्र जेथे शस्त्रक्रिया करू शकते, तिथेच ते जीव घेऊ शकते याच न्यायाने, हे तंत्रज्ञानही गुन्हेगारीच्या मार्गावर वळले, तर त्याचे परिणाम किती भयावह असतील, हे पाहायला फारसा वेळ लागलेला नाही. सध्या आपण अशा टप्प्यावर आहोत, जिथे ‘खरे’ आणि ‘खोटे’ यामधील सीमारेषा अगदी अस्पष्ट होऊ लागली आहे आणि हे घडवून आणत आहे, ते म्हणजे एआय तंत्रज्ञानातील एक नवसंशोधन ‘डीपफेक’.

आजच्या घडीला सायबर गुन्हेगार या डीपफेकच्या माध्यमातून केवळ एखाद्याचा चेहरा हुबेहूब बनवत नाहीत, तर त्याचा आवाज, बोलण्याची शैली, हावभाव, संवादाची लय इतक्या बारकाईने नक्कल करतात, की सामान्य माणसाला ती व्यक्ती खरी आहे यावर पूर्ण विश्वास बसतो. याच विश्वासाचा गैरफायदा घेत, फसवणुकीचे अनेक भयंकर प्रकार समाजासमोर येत आहेत. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच उघडकीस आलेल्या प्रकरणाने याचे भीषण वास्तव अधोरेखित केले आहे.

वरिष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या चेर्हयाचा आणि आवाजाचा वापर करून, एका सेवानिवृत्त सरकारी अधिकारी दाम्पत्याची तब्बल ७८ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. ‘डिजिटल अरेस्ट’ची धमकी देत त्यांच्याशी खोटा संवाद साधण्यात आला आणि तो इतका वास्तवदर्शी होता की, त्यांनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवून त्यांनी स्वतःहून रक्कम ट्रान्सफर केली. ही घटना एकटी अपवादात्मक नाही. दिल्लीपासून दुबईपर्यंत, अमेरिकेपासून युरोपपर्यंत अशा घटनांची संख्या झपाट्याने वाढते आहे.

२०१९ मध्ये ब्रिटनमधील एका कंपनीच्या अधिकर्यायाने एका कॉलमध्ये आपले वरिष्ठ बोलत आहेत असा समज करून सुमारे दोन लाख युरो अन्य खात्यात वर्ग केले. नंतर उघडकीस आले की, तो आवाज देखील डीपफेकद्वारे निर्माण करण्यात आला होता. एकदा का एखाद्या व्यक्तीच्या आवाजाचा काही सेकंदांचा नमुना प्राप्त झाला की, त्यावरून त्या व्यक्तीप्रमाणे संपूर्ण संभाषण बनवता येते. आवाजातील विशिष्ट उच्चार, पॉज, शब्दांची लय हे सगळे एआयसाठी आता सहज साध्य झाले आहे. समाज माध्यमांसाठी ही धोक्याची घंटा ठरत आहे. प्रसिद्ध कलाकार किंवा राजकारणी काही वस्तूंची जाहिरात करताना दिसतात, पण प्रत्यक्षात त्यांनी असा कोणताही करार केलेला नसतो. या बनावट व्हिडिओंमुळे केवळ आर्थिक फसवणूक होत नाही, तर त्या व्यक्तीच्या सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठेलाही तडा जातो.

निवडणुकांच्या काळात तर अशा बनावट प्रचारांची संख्या आणि तीव्रताही वाढते. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये देशाच्या पातळीवरील नेत्यांचे चेहरे विविध प्रादेशिक भाषांत भाषांतरित करत, प्रत्यक्ष संवादासारखे व्हिडिओ प्रसारित झाले होते. काही वेळा अशा क्लिप्स द्वेष पसरवण्यासाठी मुद्दाम बनवल्या जातात. या प्रकारांमुळे समाजात तणावाचे वातावरण तयार होते.

केवळ व्हिडिओच नव्हे, तर खोट्या कॉल्सच्या माध्यमातूनही फसवणूक केली जाते. बँकेचा अधिकारी म्हणून बोलत असल्याचे भासवून, एआयच्या सहाय्याने हुबेहूब आवाजात संवाद साधला जातो आणि खात्याची माहिती, ओटीपी, आधार क्रमांक गोळा करून पैसे लंपास केले जातात. आजवर अनेक सायबर गुन्हेगारांनी बनावट नोकरीच्या जाहिराती, बनावट एचआर अधिकारी, खोट्या मुलाखती आणि त्यानंतर ‘प्रोसेसिंग फी’च्या नावाखाली लुबाडणूक केली आहे. काही वेळा एआयच्या सहाय्याने एखादा आकर्षक चेहरा तयार करून, त्या आभासी व्यक्तीशी भावनिक नातं निर्माण करून फसवणूक घडवली जाते. समाजात या नव्या स्वरूपातील गुन्ह्यांचे प्रमाण इतके वाढते आहे की, पारंपरिक फसवणूक प्रकार या तुलनेत फिके वाटावेत.

भविष्यात एआयची ही क्षमता इतकी अधिक बळकट होईल की, प्रत्यक्ष व्यक्तीची गरजच उरणार नाही. कोणताही सार्वजनिक चेहरा वापरून त्याच्याशी संबंधित नसलेल्या गोष्टी प्रसारित करणं सहज शक्य होईल. उदा. एखाद्या राजकारण्याच्या मुखातून चुकीचे विधान करून जनतेत संभ्रम निर्माण करणं, एखाद्या उद्योजकाच्या आवाजात खोटे आदेश देऊन कोट्यवधींचा अपहार करणं, किंवा एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याच्या चेर्हयाचा वापर करून चुकीचा संदेश देणं हे सर्व काही सहज शक्य होईल. हे प्रकार केवळ फसवणूक नाही, तर सामाजिक तणाव, गोंधळ, आर्थिक आणि राजकीय अस्थिरता यांना खतपाणी घालणारे ठरू शकतात. एआयवर सध्या जगभर संशोधन सुरू आहे आणि या संशोधनातून अधिक वास्तवदर्शी आभासी चेहरे, आत्मनिर्भर संवाद प्रणाली आणि शिकणारे यंत्रमानव तयार होत आहेत. हे यंत्रमानव केवळ संवादच साधत नाहीत, तर समोरच्या व्यक्तीच्या भावना, शब्दांचा लहेजा, बोलण्याची पद्धत आणि संदर्भ लक्षात घेऊन उत्तर देतात. यामुळे भविष्यात एखादी बनावट व्यक्ती ही तुमच्याशी इतक्या नैसर्गिकपणे संवाद साधू शकते की तुमचं गोंधळात पडणं अगदी सहज शक्य आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर अपरिहार्यपणे प्रश्न उपस्थित होतो, या प्रकारांना दोषी कुणाला ठरवावं? संशोधक? तंत्रज्ञान? की समाज? प्रत्येक काळात नव्या शोधांना या प्रश्नांचा सामना करावा लागतो. जेव्हा पहिल्यांदा अणुऊर्जेचा शोध लागला, तेव्हा ती ऊर्जा मानवजातीच्या प्रगतीसाठी वापरली जावी, अशी आशा होती. पण त्याच ऊजेर्चा वापर नागासाकी व हिरोशिमावर विनाशक बॉम्ब टाकण्यासाठी करण्यात आला. तंत्रज्ञान स्वतःहून विनाशक नसते; त्याचा वापर कसा केला जातो, हेच खरे निर्णायक ठरते.

कृत्रिम बुद्धिमत्ता हीदेखील अशीच एक शक्ती आहे. ती अंधांची डोळ्यांसारखी मदत करू शकते, शेतीतील उत्पादन वाढवू शकते, रुग्णांच्या जीवनाचे रक्षण करू शकते; परंतु जर तिचा उपयोग खोट्या चेहर्‍यांचा आणि बनावट संवादाचं जाळं विणण्यासाठी केला गेला, तर ती शक्ती विध्वंसक ठरते. अर्थात, एआय विकसित करणार्‍या कंपन्यांनी आणि संशोधकांनीही या तंत्रज्ञानावर काही मयार्दा आणि सुरक्षिततेचे नियम लागू करणे आवश्यक आहे. हे तंत्रज्ञान सार्वजनिकपणे वापरण्याच्या अगोदर त्याच्या दुरुपयोगाला प्रतिबंध करर्णाया यंत्रणा उपलब्ध करून देणे, हे त्यांच्या सामाजिक जबाबदारीच्या कक्षेत येते. सरकारनेही यासाठी स्वतंत्र कायदे, तपास यंत्रणा आणि तांत्रिक समन्वयक व्यवस्था निर्माण केली पाहिजे. बनावट व्हिडिओ, आवाज किंवा संकेतस्थळ तयार करर्णायांविरोधात कठोर कारवाई करणं गरजेचं आहे. अन्यथा गुन्हेगारीला बळ मिळेल.

या सगळ्यांपेक्षा अधिक महत्त्वाची आहे ती समाजाची सजगता. नागरिक जर स्वतः सावध, सूज्ञ आणि शहानिशा करणारे असतील, तर अशा प्रकारांना अडथळा निर्माण होतो. कोणताही व्हिडिओ, फोन कॉल किंवा मेसेज आला, की लगेच त्यावर विश्वास ठेवू नये. त्या माहितीची खात्री करणे गरजेचे आहे. समोरची व्यक्ती खरंच तीच आहे का, हे स्वतः तपासून पाहिलं पाहिजे. शक्य असेल तर त्या व्यक्तीशी थेट किंवा दुसर्‍या मार्गाने संपर्क साधावा. कोणी पैसे मागत असेल किंवा महत्त्वाची वैयक्तिक माहिती - जसे की बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक, ओटीपी झ्र विचारत असेल, तर ती देण्याआधी काळजीपूर्वक विचार करावा. आताच्या काळात चेहरा किंवा आवाज केवळ ओळख पटवण्यासाठी सुरक्षित माध्यम राहिलेले नाहीत. हे दोन्ही एआयच्या मदतीने बनावट तयार करता येतात. त्यामुळे ओळख पटवण्यासाठी एकाच गोष्टीवर विसंबून न राहता, एकापेक्षा अधिक पद्धती वापरणं आवश्यक आहे. जसं की, पासवर्डसोबतच मोबाईलवर येणारी पुष्टी (ओटीपी), बोटाचा ठसा, डोळ्याचा स्कॅन किंवा खास ठरलेला संकेत - अशा गोष्टींचा वापर करूनच खात्री करावी. हे उपाय सोपे असले, तरी खूप प्रभावी आहेत आणि फसवणुकीपासून वाचवू शकतात.

शाळा-महाविद्यालयांमध्ये नव्या पिढीला याबाबत जागरूक करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे लागेल. माध्यमांचीही जबाबदारी वाढते. त्यांनी वेळोवेळी जनजागृती मोहिमा राबवून, बनावट व्हिडिओ आणि प्रचाराचे स्वरूप उघड करणे आवश्यक ठरते. एआय ही केवळ संगणकावर चालणारी प्रणाली नसून ती मानवाच्या नैतिकतेच्या परीक्षणाची संधीही आहे. आपण याचा उपयोग समाजहितासाठी करणार की विध्वंसासाठी हे आपणच ठरवले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान आहे, दैवत नव्हे. त्यामुळे त्याच्या वापराबाबत निर्णयही माणसालाच घ्यावे लागतील. तंत्रज्ञान अटळ आहे, त्याचप्रमाणे त्याचा गैरवापर टाळण्याची जबाबदारीही आपलीच आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने सजग राहून, आपल्या भोवती ज्ञान आणि संवेदनशीलतेचं बळकटीकरण केलं पाहिजे. कारण आज समोर उभे असलेले हे धोके केवळ सायबर गुन्ह्यांपुरते मर्यादित नाहीत, तर ते समाजाच्या एकूण मूल्यव्यवस्थेला, विश्वासाला आणि स्थैयार्ला हादरवू शकतात. त्यामुळे वेळीच सावध होणं गरजेचं आहे.

# भारतात टेस्ला म्हणजे नाकापेक्षा मोती जड!




अमेरिकेसह जगभरातील विविध देशांमध्ये इलेक्ट्रिक (विद्युत) वाहन उत्पादन क्षेत्रात नवक्रांती घडविणार्‍या टेस्ला कंपनीने भारतात नुकताच प्रवेश केला. टेस्लाचे भारतात येणे, हा खरंच येथील नागरिकांसाठी नफ्याचा की तोट्याचा सौदा आहे, याचाही विचार करणे गरजेचे आहे. टेस्लाने आपल्या कारचे उत्पादन भारतात न करता अमेरिका आणि चीनमधील आपल्या कारखान्यांतून करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथूनच कार भारतात येतील. विविध करांमुळे भारतात त्यांची किंमत मूळ किमतीच्या दुप्पट होणार आहे. त्यामुळे भारतात टेस्ला म्हणजे नाकापेक्षा मोती जड अशीच काहीशी स्थिती सध्याच्या घडीला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीय मानले जाणारे जगप्रसिद्ध उद्योगपती एलन मस्क यांची टेस्ला कंपनी भारतात आताच नव्हे तर जवळपास गेल्या १० वर्षांपासून गुंतवणूक करण्यास इच्छुक होती. २०१४ साली सप्टेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेक इन इंडियाची संकल्पना मांडल्यानंतर जगभरातील विविध क्षेत्रांतील बड्या कंपन्यांना भारतात येऊन उत्पादन करण्यासाठी निमंत्रण देण्यात आले होते.

यात टेस्लाचाही समावेश होता. ऑटोमोबाईल क्षेत्रातील जगभरातील तिसरी मोठी बाजारपेठ असर्णाया भारतात गुंतवणुकीच्या दृष्टीने पाय रोवण्यासाठी एलन मस्क यांनी स्वारस्यही दाखवले होते. त्यामुळे सप्टेंबर २०१५ मध्ये अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी टेस्लाच्या पॅलो ऑल्टो मुख्यालयाला भेट दिली होती. या ठिकाणी जसे टेस्ला गाड्यांचे उत्पादन होते तसेच ते भारतात करण्यासाठी यावेळी चर्चा करण्यात आली होती.

परंतु, यासाठी जागा निश्चित झाली नव्हती. त्यानंतर जुलै २०१६ मध्ये केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरींनी अमेरिकेचा दौरा करत टेस्ला फॅक्टरीला भेट दिली. भारतात येऊन गाड्यांचे उत्पादन सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी टेस्लाला दिला. परंतु, कररचना, जागेची अनिश्चिती यांसारख्या मुद्यांमुळे भारताकडून आलेले प्रस्ताव काही पसंतीस न उतरल्याने नुसते चर्चेचे गुऱ्हाळच सुरू राहिले. जवळपास पाच वर्षे हेच सुरू राहिले.

मात्र, याउलट चीनने आपल्यानंतर टेस्लासोबत चर्चा करत २०१९ साली आपल्या देशात मेगाफॅक्टरीही सुरू केली. अमेरिकेसोबत विविध मुद्द्यांवर संबंध ताणलेले असतानाही व्यवसायासाठी मात्र ते सर्व बाजूला ठेवत चीनने मस्क यांच्यासोबत हातमिळवणी करत आपल्या देशात टेस्लाची फॅक्टरी सुरू करून दाखवली. केवळ चीनच नाही, तर जपाननेदेखील त्यानंतर चर्चा सुरू करत २०२२ साली आपल्या देशात टेस्ला गाड्यांचे उत्पादन सुरू केले.

२०१४ साली प्रयत्न केल्यानंतरही टेस्लाने काही भारतात आपल्या गाड्यांचे उत्पादन सुरू केले नाही. चीन आणि जपानमध्ये मात्र आपल्या गाड्यांचे उत्पादन विलंब न करता तातडीने सुरू केले. चीन आणि जपानमध्ये टेस्लाचे कारखाने सुरू झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा नव्याने प्रयत्न सुरू केले. जून २०२३ मध्ये मोदी यांनी अमेरिका दौरा करत पुन्हा एकदा मस्क यांची भेट घेतली आणि नव्याने प्रस्ताव सादर केला.

तसेच याबाबत पाठपुरावाही करण्यास सुरुवात केली. नोव्हेंबर २०२३ मध्ये केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनीही अमेरिका दौरा करत टेस्ला फॅक्टरीला भेट दिली. त्यानंतर मार्च २०२४ मध्ये टेस्लाला भारतात गुंतवणूक करता यावी यासाठी ऑटोमोबाईल क्षेत्रातील परदेशी गुंतवणुकीच्या (एफडीए) धोरणात बदल करण्यात आला. त्यानंतर मस्क यांनी अखेरीस भारतात टेस्ला गाड्यांचा व्यवसाय करण्यास रस घेतला. परंतु, गाड्यांचे उत्पादन भारतात न करण्याच्या मुद्द्यावर ते ठाम राहिले.

२०१४ ते २०२४ या १० वर्षांच्या काळात या एकच मुद्द्यावर ते अडून राहिले आणि भारतात टेस्लाचे आगमन काही झाले नाही. भारतासोबत त्यांनी आपल्या अटी आणि शर्थी कायम ठेवल्या. भारताला त्यांनी तितकी चांगलीशी वागणूक दिली नाही जितकी चीन आणि जपान यांसारख्या राष्ट्रांना दिली. चीन आणि जपानसोबत त्यांनी व्यवस्थितपणे चर्चा करत त्यांच्या देशांमध्ये आपल्या गाड्यांचे उत्पादन व्यवस्थितरित्या सुरूही केले.

तेथे त्यांना कोणत्याही अडचणी वाटल्या नाहीत. भारतासोबत मात्र ते विविध मुद्द्यांवर वाटाघाटी करत राहिले. टेस्ला कंपनीला भारतात उत्पादन केंद्र सुरू करायला फक्त ४,१५० कोटींची गुंतवणूक करण्याची गरज होती. परंतु, ते यासाठीही तयार झाले नाहीत. याउलट टेस्लाने चीनमधील शांघायमध्ये कारखाना उभारण्यासाठी सुमारे २ अब्ज डॉलर्सची महागडी गुंतवणूक केली. जपान आणि जर्मनी यांसारख्या देशांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी चीनपेक्षाही जवळपास दुप्पटीने खर्च केला. परंतु, भारतात कमी खर्च असला तरी गुंतवणुकीसाठी ते तयार झाले नाहीत.

२०२४ रोजी भारताने ऑटो मोबाईल क्षेत्रातील परदेशी गुंतवणुकीच्या धोरणात बदल केल्यानंतरही मस्क काही भारतात गाड्यांच्या उत्पादनास अनुत्सुकच राहिले. भारताच्या जवळच्या देशांमधूनच टेस्ला गाड्यांचा पुरवठा करण्यावर ते पुन्हा अडून बसले. आम्हाला आधी गाड्या विक्री करू देण्याची परवानगी नसेल तर तेथे टेस्ला कारखाना उभारणार नाही, असे ते केवळ भारताला सांगत राहिले. इतर देशांसोबत मात्र त्यांनी हे धोरण अवलंबले नाही.

त्यांना त्यांनी चांगली वागणूक दिली. २०२४ ला भारताने एफडीएच्या धोरणात बदल केल्यानंतरही टेस्लाला भारतात येण्यास जवळपास वर्षभराचा कालावधी गेला. १५ जुलै २०२५ ला टेस्लाचे मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे पहिले शोरूम सुरू झाले. येथून व्यवसायाला सुरुवात करून टेस्ला लवकरच भारतातील इतर काही महत्त्वाच्या शहरांमध्ये आणखी काही शोरूम सुरू करण्याच्या तयारीत आहे.

दिल्ली, बंगळुरू, चेन्नई यांसारख्या विविध शहरांमध्ये येत्या काही दिवसांत शोरुम सुरू करून टेस्ला भारतात व्यवसायाचे पाय रोवणार आहे. परंतु, मूळ मुद्दा हाच की, या गाड्यांचे उत्पादन काही भारतात होत नसून ते अमेरिका अथवा जवळच्या राष्ट्रांमध्ये उत्पादन करून भारतीय ग्राहकांना पुरविणार आहे.

अमेरिकेने लादलेल्या नव्या टॅरिफ (कर) धोरणामुळे मूळ उत्पादनापेक्षा जवळपास दुपटीने महाग गाड्यांची विक्री भारतात करणार आहे. टेस्लाने गाड्यांचे उत्पादन येथे केल्यास त्याच्या किमती या कमी असत्या. परंतु, या गाड्यांची आयात अमेरिकेतून किंवा भारतानजीकच्या देशांमधून होत असल्याने या गाड्या ३५ ते ४० लाखांऐवजी थेट ६० लाखांच्या घरात भारतात विकल्या जांणार आहेत.

टेस्लाने मुंबईत आपला व्यवसाय सुरू करताना आपल्या शोरूमचा फलक हा मराठीत लावल्याने समाजमाध्यमावर त्याचे कौतुकही होत आहे. परंतु, यामागेही येथील सत्तार्धायांचे राजकारण असल्याचा संशय आहे. मध्यंतरी हिंदीच्या सक्तीनंतर सत्ताधारी भाजपची प्रतिमा मराठीविरोधी असल्याचा संदेश जनमानसात गेला होता. ती सुधारण्यासाठी टेस्लासारख्या आंतरराष्ट्रीय कंपनीलाही मराठी नामफलक लावण्यासाठी भाग पाडले गेले असावे.

भारतात टेस्लानेच पहिली इलेक्ट्रिक गाडी आणली, असा काही भाग नाही. भारतात टाटासारख्या स्वदेशी कंपन्यांकडून बनविल्या जाणार्‍या विद्युत गाड्यांनाही ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भारतात केवळ टाटाच नाही तर मारुती सुझुकी, बजाज यांसारख्या कंपन्यांच्याही अनेक गाड्या ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. केवळ भारतीय नाही तर अनेक परदेशी कंपन्यांच्याही इलेक्ट्रिक गाड्या भारतात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

या सर्व गाड्यांच्या तुलनेत टेस्ला अधिक किलोमीटर चालण्याची क्षमता ठेवते. त्यामुळे टेस्लाच्या गाड्यांना जगभरात अधिक मागणी आहे. परंतु, भारतात ती कितपत यशस्वी ठरेल, हे येणारा काळच ठरवेल. भारतातील खड्डेमय रस्ते, जागोजागी होणारी वाहतूक कोंडी, कमी प्रमाणात चार्जिंग स्टेशन्स, आदी समस्यांमुळे इलेक्ट्रिक वाहनधारकांना विविध गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

इलेक्ट्रिक वाहनांद्वारे शहरांतर्गत वाहतूक करणे सोपे आणि कमी खर्चाचे असले तरी या गाड्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी तितक्या उपयोगी नसल्याचा अनेकांचा आतापर्यंतचा अनुभव आहे. मध्यंतरी इलेक्ट्रिक वाहने ही टोलमुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला. पर्यावरणपूरक असर्णाया इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीला चालना मिळण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येते.

परंतु, कमी चार्जिंग स्टेशन्सच्या अभावी या गाड्या लांब पल्ल्याच्या प्रवास करण्यास अडचणीच्या ठरत असल्यामुळे टोलमाफीचा उपयोग तरी काय, असा सवाल वाहनचालकांचा आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक गाड्या या स्वदेशी असो वा परदेशी आपल्याकडे चार्जिंग स्टेशन्सची संख्या वाढविण्याची गरज आहे, हे काही नव्याने सांगण्याची गरज नाही. चार्जिंग स्टेशन्सच्या संख्येत वाढ झाल्यास इलेक्ट्रिक गाड्यांच्या खरेदीदारांचीही संख्या आपसुकच वाढेल.

# आदिवासी मजुराला बेदम मारहाण, जातीवाचक शिविगाळ



**■भिवंडी :** जुन्या वादाच्या रागातून एका शेत मजुरीचे काम करणाया आदिवासी कामगाराला जातीवाचक शिवीगाळ करून त्यास तिघा सख्ख्या भावांनी आपसात संगनमताने बेदम मारहाण केल्याची घटना भिवंडी तालुक्यातील पाये गावातून समोर आली आहे. याप्रकरणी तिघांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान जून महिन्याच्या शेवटी परश्याचा चुलत भाऊ संतोष पवार याच्याशी आरोपीत तिघा भावांचा मजुरीच्या कारणावरून वाद होऊन भांडण झाले होते. त्यावेळी तिघा भावांनी संतोषला मारहाण करून त्याची दुचाकीची तोडफोड केली होती. त्यानंतर सदर भांडण परश्याच्या मध्यस्थीने मिटले होते. परंतु याच भांडणाचा राग मनात धरून ११ जुलै रोजी परश्या हा त्याचे नातेवाईकासोबत दुचाकीने सायंकाळी साडे पाच वाजताच्या सुमारास पाये नाक्यावर भाजी आणण्यासाठी जात असतानाच वरील तिघांनी त्यास रस्त्यात अडवून जातीवाचक शिवीगाळसह गाडीच्या चावीने तसेच ठोश्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेची माहिती श्रमजीवी संघटनेचे हैदर कासट यांना मिळाल्यानंतर त्यांनी तालुका अध्यक्ष सागर देसक, गुरुनाथ वाघे, अमोल मुकणे, शिवदास मांगात, किशोर हुमणे, नीता घरत व नाईक पाडा येथील २५ ते ३० सभासद यांच्यासह तालुका पोलीस ठाणे गाठून पोलीस ठाण्यात परश्याच्या फिर्यादीवरून दिलेल्या तक्रारीवरून बाल्या, मंदार, मनिष या तिघांच्या विरोधात अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अजूनही लाखो रेशनिंग कार्ड धारकांची ई-केवायसी अपूर्ण



**■पालघर :** पुरवठा विभागाकडून रेशनिंग कार्ड धारकांना ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरवठा विभागाकडून वेळोवेळी मुदतवाढ दिल्यानंतरही पालघर जिल्ह्यात ४ लाख ५४ हजार २७४ लाभार्थ्यांची केवायसी अपूर्ण आहे.एकूण लाभार्थ्यांपैकी २४.४८ टक्के लाभार्थ्यांची केवायसी पूर्ण नसल्याने त्यांना रेशनिंग दुकानातून मिळणाया धान्यांपासून वंचित राहावे लागणार आहे. पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यांमधील १ हजार ८५ रेशनिंग दुकानांमधून अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात सुमारे १ लाख सात हजार ७०१ क्विंटल धान्य लाभार्थ्यांना वितरित केले जात आहे. दुर्गम भाग असलेल्या मोखाडा तालुक्यातील ३३.०७ टक्के लाभार्थ्यांची केवायसी अपूर्ण आहे. पुरवठा विभागाकडून वेळोवेळी केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन रेशनिंग कार्ड धारकांना करण्यात आले होते.पालघर जिल्ह्यातील एकूण १८ लाख ५५ हजार ५९१ लाभार्थ्यांपैकी ४ लाख ५४ हजार २७४ लाभार्थ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. रेशनिंग कार्डधारकांना ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ई-केवायसी करण्याची मुदत उलटल्याने ई-केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांबाबतचा निर्णय शासन स्तरावरून होण्याची शक्यता आहे.तर प्रलंबित ई-केवायसी बाबतच्या दुकाननिहाय याद्या दुकानदारांना देण्यात आल्या आहेत.धान्याचा लाभ घेणाऱ्या रेशनिंग कार्ड धारकांनी ई-केवायसी बाबतचे तपशील रेशनिंग दुकानातून तपासून घेतल्यानंतर प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. केवायसी नसलेल्या लाभार्थ्यांबाबत शासन स्तरावरून निर्णय होईल,असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# मालमत्ताकरावरील दंडाच्या रकमेत मोठी सवलत



**■पनवेल :** महापालिकेने मालमत्ता करावरील दंड माफ करावा, अशी मागणी होत होती. त्याची दखल घेत पनवेल महापालिकेने १८ जुलै ते २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत अभय योजना योजना लागू केली आहे. त्यामुळे आता सर्वांनी संपूर्ण मालमत्ता कर भरावा, असे आवाहन पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी गुरुवारी (१७ जुलै) केले आहे. यावेळी कर विभागाचे उपायुक्त स्वरुप खारगे आणि परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे उपस्थित होते.

पनवेल महापालिकेची २०१६ मध्ये स्थापन झाली. तेव्हापासून मालमत्ता कराचा प्रश्न भेडसावत आहे. सिडकोकडून जमा केले जाणारे सेवा शुल्क आणि आणि महापालिकेचा मालमत्ता कर, अशी दुहेरी करामध्ये पनवेल महापालिका हद्दीतील सिडकोच्या नोडमधील रहिवासी आणि ग्रामपंचायतमधील रहिवासी यांची कोंडी झाली होती. पुढे हे प्रकरण कोर्टात गेले. मात्र, ज्यांनी कर भरला नाही त्यांना मोठा दंड महापालिकेने आकारला होता.

त्यामुळे दंड रकमेत सूट द्यावी, अशी मागणी पनवेल महापालिका हद्दीतील रहिवाशांसह संसद सदस्य, विधिमंडळ सदस्य, विविध लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, विविध सोसायट्या, माध्यमांमधून केली जात होती. याचा विचार करून दंड रकमेत सवलत देण्याबाबत अभय योजना लागू करण्यात आली आहे. असे आयुक्त मंगेश चितळे यांनी स्पष्ट केले.

पनवेल महापालिकेची वेबसाईट किंवा ढटउ ळ७ अस्त्रत्र तसेच पनवेल कनेक्ट ॲपद्वारे मालमत्ता कर ऑनलाईन भरणाऱ्यांना करामध्ये २ टक्के सवलत मिळेल. तसेच २०२५-२६ या आर्थिक वषार्चा कर ३१ जुलैपर्यंत भरल्यास ५ टक्के सूट मिळेल, असे मालमत्ता कर उपायुक्त स्वरुप खारगे स्पष्ट केले आहे.

**नवीन मालमत्ता कर संकलन केंद्रे**

- प्राईड सोसायटी सेक्टर ७, खारघर
- गंगा टॉवर, सेक्टर २१ कामोठे
- अलियश बिल्डींग से.१७ प्लॉट नं.८४ मोठा खांदा नवीन पनवेल
- सर्व ५ प्रभाग कार्यालये (नावडे उपविभागासहित)
- मुख्यालय पनवेल

# पदोन्नती मिळूनही लिपिकाचेच काम

## महापालिकेच्या १०५ कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी, कार्यभार मिळण्याच्या प्रतीक्षेत



**अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार**

ठाणे महापालिकेत मागील काही वर्षांत २ हजारांहून अधिक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांना एकाच वेळेस अनेक विभागांचा कार्यभार सांभाळावा लागत आहे. एका कार्यकारी अभियंत्याकडे चार ते पाच विभागांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर देखील कामाचा ताण वाढत आहे.

**■ठाणे :** तब्बल ३० वर्षांनी पदोन्नती मिळाली परंतु पदोन्नतीचा आनंद घेता येत नाही अशी स्थिती पालिकेतील कर्मचाऱ्यांची झाली आहे. वरचा हुद्दा मिळून देखील कनिष्ठ पदावर काम करावे लागत असल्यामुळे पालिका कर्मचाऱ्यांमध्ये मोठी नाराजी आहे.

तब्बल ३० वर्षांनी पालिकेला जाग आल्यानंतर अखेर ठाणे महापालिकेत पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अनेकांना पदोन्नती देण्यात आली. त्यात वरिष्ठ लिपिक ते उपाधीक्षक पदी पदोन्नती मिळालेल्या ५४ जणांना अद्यापही त्यांचा कार्यभार मात्र मिळू शकला नसल्याची माहिती समोर आली आहे. हीच अवस्था लिपिकांची झाली असून ४९ जणांना वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती देऊनही त्यांना नवीन कार्यभार मिळू शकलेला नाही. या कर्मचाऱ्यांची सुमारे एक महिन्यापूर्वी पदोन्नती झाली होती. परंतु आजही हे कर्मचारी लिपिकाचेच काम करीत असल्याचे दिसत आहे.

ठाणे महापालिकेच्या सेवेतून दरमहा २५ ते ४५ कर्मचारी, अधिकारी हे सेवानिवृत्त होत आहेत. त्यात आता मागील कित्येक वर्षांपासून महापालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळत नव्हती. अखेर पालिकेने यंदा रखडलेल्या पदोन्नतीचा मार्ग देखील मोकळा केला आहे. त्यानुसार आतापर्यंत १५८ जणांना महापालिकेने पदोन्नती दिली आहे. त्यानंतर मागील कित्येक वर्षे रखडलेला भरतीचा मार्ग देखील आता प्रशस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अशातच मागील महिन्यात ठाणे महापालिकेने लिपिक पदी काम करीत असलेल्या ४९ जणांना वरिष्ठ लिपिक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. शिवाय वरिष्ठ लिपिक ते उपाधीक्षक पदावर ५६ जणांना पदोन्नती देण्यात आली आहे. परंतु त्यांची ही पदोन्नती सध्या केवळ नावापूर्तीच राहिल्याचे चित्र दिसत आहे. मागील महिनाभरापासून १०५ जणांना पूर्वीचेच काम करावे लागत आहे.

जोपर्यंत वरिष्ठ लिपिक हे उपाधीक्षक पदी रूजू होत नाहीत तोपर्यंत लिपिकांना वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होता येत नसल्याचे चित्र दिसत आहे. आधीच पालिकेत कर्मचाऱ्यांची वानवा असताना देखील पदोन्नती देण्यात आल्यानंतर केवळ वरिष्ठ पातळीवर विभागवार जागा रिक्त नसल्याने त्यांचे पद स्थापन करण्यात अडचणी येत असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली आहे. तर सध्या जे कर्मचारी ज्या विभागात कार्यरत आहेत, त्यांनी त्याच विभागात वरिष्ठ पातळीवर काम सुरू केले असल्याचा दावा पालिकेने केला आहे.

# पीक विमा योजनेचा फज्जा, वर्ष उलटूनही पीक विम्याची रक्कम मिळेना



**ह्याआधारह्यने दिला दगा**

या संपूर्ण प्रकरणात अनेक शेतकऱ्यांचे बँकेचे खाते आधारला लिंक न केल्याने त्याची झळ त्यांना पोहोचली आहे. दरम्यान, विमा कंपनीकडून भरपाई देण्याचे काम सुरू असून काही तांत्रिक कारणांमुळे ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. यंदाही विमा नोंदणी सुरू असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विमा नोंदणी करावी!

-वंदना शिंदे, अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी, रायगड

**■अलिबाग :** पंतप्रधान विमा योजनेचा भोंगळपण रायगड जिल्ह्यात उघड झाला आहे. २०२४ मध्ये पीक विम्यासाठी पात्र ठरलेल्या १ हजार १७२ शेतकऱ्यांना एक वर्षानंतरही विम्याची रक्कम मिळालेली नाही. ही रक्कम तब्बल ८८ लाखांची असून आर्थिक मदतीशिवाय ठेवल्याने शेतकरी संताप व्यक्त करत आहेत.

गेल्या वर्षी खरीप हंगामासाठी पंतप्रधान पीक विमा योजना लागू करण्यात आली होती. यात गारपीट, पूर, दुष्काळ, ढगफुटी, पेरणी न होणे, भूस्खलन तसेच पावसात पडलेला खंड यांचा समावेश होता. त्यातून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे आणि आर्थिक आधार मिळावा यासाठी रायगड जिल्ह्यात चोलामंडलम एमएस जनरल इन्शुरन्स कंपनीकडून पीक विमा योजना सुरू करण्यात आली. भातपिकासाठी केवळ १ रुपयात ५० हजार रुपये पीक विमा संरक्षणाचा लाभ देण्याची योजना होती. कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवण्यात आली होती.

रायगडमध्ये अंदाजे ९३ हजार हेक्टरवर भात पिकवला जातो. यातील ९८ टक्के शेतकरी पावसाच्या पाण्यावर भाताची लागवड करतात. जिल्ह्यात भातपिकाला विमा संरक्षित रक्कम ५१ हजार ७६० रुपये आहे. तर नाचणीसाठी २० हजार रुपये आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांचे अती पावसाने नुकसान झाल्यास किंवा वरील नियमांप्रमाणे पंतप्रधान पीक विमा योजनेतून भरपाई मिळणार होती. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी पीक विमा योजनेत सहभागी झाले होते.

प्रत्यक्षात ४० हजार ३४७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आणि त्यातील १ हजार ८२० शेतकरी नुकसान भरपाईसाठी पीक विम्याला पात्र ठरले होते. त्यासाठी १ कोटी ३२ लाख १० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला होता. पण केवळ ६४८ शेतकऱ्यांना ४३ लाखांचा भरपाई विमा कंपनीकडून मिळाली तर १ हजार १७२ शेतकरी आजही विम्याच्या रकमेच्या प्रतीक्षेत आहेत.

# महावितरण आणखी किती अंत पाहणार

## शिहू बेणसे विभागातील अनागोंदी कारभारामुळे ग्राहक आंदोलनाच्या पवित्र्यात



**■पनवेल :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामधील शिहू बेणसे विभागात विजेच्या समस्येने कळस गाठला आहे. पावसाळ्याच्या सतत खंडित होणार वीजपुरवठ्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे विजेचा लपंडाव वर्षभर सुरू असतो. यामुळे येथील वीजग्राहक मेटाकुटीला आले असून त्यांच्या महावितरणविरोधात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे आमच्या सहनशीलतेचा अंत पाहिलात तर पळता भुई थोडं करू, असा इशारा देत रहिवाशांनी महावितरणविरोधात उग्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. अनेक वर्षांपासून शिहू बेणसे भागात वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा झाला आहे. दिवसा-रात्री कधीही वीजपुरवठा बंद होतो आणि लोकांचे हाल सुरू होतात. यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे, छोट्या व्यावसायिकांचे धंदे तोट्यात जात आहेत, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे तर रुग्णांना याची मोठी झळ सोसावी लागत आहे. यानंतर तक्रार केल्यानंतर महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी ढुंकूनही पाहात नाहीत. आदिवासी वाड्यांमध्ये तर अंधाराचाच मुक्काम जास्त असतो. याला कंटाळून लोक आता आंदोलनाच्या पावित्र्यात उभे ठाकत आहेत. वीजपुरवठा बंद होताच नेटवर्कअभावी बँकांचे व्यवहार ठप्प होतात. इंटरनेट संबंधित शासकीय, निमशासकीय कामांना ब्रेक लागतो. कधी कधी सलग तीन-चार वीजपुरवठा ठप्प राहतो तर कधी १० दिवसांनंतरही वीजपुरवठा पूर्ववत होत नसल्याची या विभागातील महिला-पुरुष, व्यावसायिकांची तक्रार आहे. तक्रारी करूनही वीजपुरवठ्यात काहीही सुधारणा होत नसल्याने महावितरणविरोधात या विभागात संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे महावितरणचा कारभार सुधारला नाही तर उग्र आंदोलन छेडू, असा इशारा बेणसेच्या माजी सरपंच स्मिता कुथे यांनी दिला आहे.

# चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला १२ तासांत अटक




**■भाईंदर :** मिरा-भाईंदर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सराईत चेन स्नॅचिंग चोरांना गुन्हा घडल्यानंतर १२ तासांत अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून २ लाख ९० हजार ७५० रुपये असा मुद्देमाल जप्त करत एकूण २० गुन्ह्यांची उकल केली आहे. मिरारोड पूर्वेच्या पेणकर पाडा रोड परिसरात भक्ती वेदांत रुग्णालयाच्या समोर रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या ७२ वर्षीय जेष्ठ महिलेची गळ्यातील पाच तोळे वजनाचे सोन्याची चैन खेचण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.त्याला या महिलेने प्रतिकार केला असता आरोपी आणि त्याचा साथीदार यांनी फिर्यादी यास धक्का मारून खाली पाडत चैन चोरी केली होती. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरात बेदरकारपणे अशा चोरीच्या घटना घडत असल्याने वरिष्ठांनी आदेश दिल्यानुसार त्याचा समांतर तपास गुन्हे शाखा करत होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळ, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीवरून आरोपी शहजाद इमाम मोहम्मद आरिफ हैदरी उर्फ विकी उर्फ गधीर अमरोही आणि अबू तोराब ताजदार हुसेन यांना मुंबईकडून जोधपूरला जाणाऱ्या सूर्यनगरी एक्सप्रेसमधून पळून जात असताना शिताफिने अटक केली आहे. तसेच या गुन्ह्यात चोरी झालेली सोन्याचे चेन व मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. तर सदरील आरोपी हा सराईत आरोपी असून त्याच्यावर फक्त मिरा-भाईंदर शहरात आतापर्यंत २० गुन्हे दाखल आहेत. तसेच हे आरोपी फक्त उत्तर प्रदेश राज्यातून मिरा-भाईंदरमध्ये चोरी करण्याकरिता येत होते. तर शहजाद इमाम उर्फ विकी उर्फ गधीर याला न्यायालयात शिक्षा सुद्धा झाली आहे. सदरची कारवाई ही नवनियुक्त पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहायक पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत व संदीप शिंदे, सहायक फौजदार अशोक पाटील, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा व पोलीस हवालदार मनोज चव्हाण, सचिन हुले, सुधीर खोत, अश्विन पाटील व सनी सूर्यवंशी आणि पोलीस शिपाई प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, धीरज मेंगाने व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान किरण आसवले तसेच सहायक फौजदार संतोष चव्हाण यांनी केली आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.).
ता. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्रं. 819 2828
// मध्यवर्ती भांडार विभाग //

जा.क्र.मनपा/मध्यवर्ती भांडार /५८/2025-26 दि. १७/०७/२०२५

// जाहिर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक 2025 करिता विविध प्रकारचे ॲक्रेलिक रबर स्टॅम्प बनविणेकामी तसेच खुल्या बाजारातील वस्तु / साहित्यांच्या तीन नामांकित कंपनीची नावे व वस्तुचे दर तसेच बाजारभावाची माहिती उपलब्ध होणेकरिता जाहीर दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत असुन सदर बाबत 5 दिवसाच्या आत दि. 23/07/2025 रोजी सायं 4.00 वाजेपर्यंत कोटेशन लेखी स्वरुपात बंद लिफाफ्यात मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, मध्यवर्ती भांडार विभाग, तळ मजला येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरफॉर्मनुसार तीन कंपनीची नावे व दराची माहिती भरुन त्वरीत देण्यात यावी.

सदरकामी विस्तृत माहिती www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा. क्र. मनपा /मावज / जाहि./ ई ६१०९६३०/२०२५-२६
दि. १८/०७/२०२५

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (मध्यवर्ती भांडार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com